## जाहिरात

सर्व मान्यता प्राप्त व्यावसायीकांना कळविण्यात येते की, पोलीस कल्याण निधी अंतर्गत पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर यांचे नवीन प्रशासकिय इमारतीच्या आवारात पोलीस कल्याण निधीअंतर्गत उपहारगृह सुरु करावयाचे असून ते उपहारगृह खालील नमुद अटी व शर्तीचे अधिन राहून ०३ वर्षांचे भाडे करारतत्वावर दयावयाचे आहे. सदर उपहारगृह बचतगट, सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी किंवा मान्यताप्राप्त व्यावसायीकांना चालविणेस दयावयाचे आहे.

तरी इच्छुकांनी दिनांक २७/०९/२०२१ रोजी सायं. १७:०० वाजेपावेतो निवीदा पोलीस अधीक्षक कार्यालयाचे शासकिय कामकाजाचे वेळेत सादर कराव्यात.

१. उपहारगृहासाठी अनामत रक्कम कमीत-कमी रुपये २,००,०००/- { अक्षरी रक्कम रुपये दोन लाख फक्त } पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर यांचेकडे जमा करणे आवश्यक आहे.

२. उपहारगृहाचे दरमहा आगाऊ मासिक भाडे कमीत-कमी रुपये १५,०००/- {अक्षरी रक्कम रुपश्ये पंधरा हजार फक्त} एक तारखेस पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर येथे जमा करणे आवश्यक आहे.

३. उपहारगृहाचे दरमहा आगाऊ मासिक भाडे हे दर वर्षी ५% ने वाढ करण्यात येईल.

### उपहारगृह चालविण्या बाबत खालील नमूद अटी व शर्ती पुर्ण करणे अपेक्षित आहे.

१. पोलीस कल्याण निधी अंतर्गत पोलीस अधीक्षक, अहमदनगर कार्यालयाच्या दक्षिण बाजुकडील गेटजवळ असलेली मोकळी जागा सुमारे २००० स्के.फु. (बांधकाम ३०० स्के.फु.) असलेल्या इमारतीसह मिळकत लिहुन घेणार यांचे सरकारी मालकी वहिवाटाची व ताब्यात असुन लिहुन देणार यांना खालील शर्ती व अटीवर ३ वर्षाकरिता लिव्ह ॲण्ड लायसेन्सी भाडे तत्वावर वापरणेस देत आहेत.

२. वर कलम १ यात वर्णन केलेल्या सदर मिळकतीचा वापर लिहुन देणार यांनी फक्त कॅन्टीन व्यवसाय म्हणुन करणेचा असुन लिहुन देणार यांना सदर ठिकाणी दुसरे कोणतेही पदार्थ ठेवावयाचे नाही.

३. लिहुन देणार यांनी सदर उपहारगृह चालविण्यासाठी आवश्यक असलेल्या खादय विक्री परवाना तसेच पोलीस विभागाचा/नॉन क्रिमीनल किंवा आरोपी नसलेचा दाखला स्वत: प्राप्त करुन घ्यावयाचा आहे.

४. सदर उपहारगृह चालवित असताना खादयपदार्थाचे दर बाजार भावा पेक्षा कमी असावेत. सदर दरपत्रक हे लिहुन देणार व लिहुन घेणार यांनी आपापसात ठरवुन ते दरपत्रक सदर उपहारगृहामध्ये दर्शनी भागावर लावण्यात यावे. परस्पर लिहुन देणार यांनी खादयपदार्थाच्या दरामध्ये वाढ करु नये.

५. सदर उपहारगृहाची वेळ सकाळी ०७:०० ते रात्री १९:०० वा पर्यंत राहिल रात्री १९:०० वाजल्यानंतर सदर उपहारगृह बंद करण्याची दक्षता लिहुन देणार यांनी घ्यावयाची आहे. जर यदाकदाचित सदर उपहारगृह रात्री १९:०० वाजेपेक्षा जास्त वेळ चालु राहिल्यास पोलीस विभागाने दंड आकारला तर तो दंड लिहुन देणार यांनी भरावयाचा आहे.

६. सदर उपहारगृह चालवित असताना स्वच्छता ठेवण्यात यावी व कचरा कचरापेटीतच टाकावा. त्यापासुन दुर्गंधी पसणार नाही याची योग्य ती दक्षता घ्यावी.

७. सदर उपहारगृहाचे ठिकाणी काही बदल करावयाचा असल्यास त्याबाबत प्रथम लिहुल घेणार यांची परवानागी घेणे बंधनकारक राहील.

Scanned with CamScanner

८. सदर ठिकाणी विक्री करण्यात येणारे खादयपदार्थ हे चांगल्या व उच्च दर्जाचे असावेत तसेच शिळे खादयपदार्थ ठेवण्यात येवु नये व त्याची विक्री करु नये. तसेच, उपहारगृहामध्ये बनविलेले अथवा पुरविलेले अन्न / पेय सेवनाने कुणाचे प्रकृती स्वास्थ बिघडल्यास त्याची जबाबदारी लिहुन देणार यांची राहील.

९. उपहारगृहातील खाद्य पदार्थांवर पोलीस अधिक्षक कार्यालयामार्फत देण्यात येणा-या ऑर्डरवर २५ % सुट असेल.

१०. उपहारगृहमधील जागेचे, वापरात दिलेले फर्निचर व साहित्य लिहुन देणार यांनी सुस्थितीत ठेवायचे असुन ती मधील कोणत्याही फर्निचर व साहित्यचे नुकसान झाल्यास सदरची नुकसान भरपाई लिहुन देणार यांनी दिलेल्या अनामत रक्कमेतुन वसुल करण्यात येईल.

११. सदर मिळकतीचा वापर कोणत्याही गैरकृत्याकरिता करु नये.

१२. सदर उपहारगृहामध्ये लिहुन देणार यांनी कोंणत्याही प्रकारचे अथवा कायमस्वरुपाचे फेरबदल करावयाचे नाहीत, अगर मिळकतीपोटी कराराने त्रयस्त इसमास कोणत्याही मार्गाने हस्तांतर करावयाचे नाही.

१३. सदर करारामध्ये लिहुन देणार व लिहुन घेणार यांच्यामध्ये लायसेन्सी असेच नाते राहणार असुन त्या व्यतिरिक्त इतर कोणतेही अधिकार लिहुन देणार यांना लिहुन घेणार यांनी दिलेले नाहीत.

१४ सदर मिळकत मुदतीपुर्वी सोडावयाची असल्यास लिहुन देणार यांनी एक महिना मुदतीची अगाऊ सुचना देणे बंधनकारक राहील .

१५. कायदयाने सदरचा करारनामा नोंदविणे गरजेचे व आवश्यक आहे, तरी त्याची सर्व खर्चाची जबाबदारी लिहुन देणार यांचेवर राहील.

१६. सदर करारनाम्यातील अटीचे व नियमांचे उल्लंघन केल्यास लिहुन देणार यांना उपहारगृह चालविण्यास देण्यात आलेली परवानगी रद्द करण्याचे सर्व अधिकारी हे पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांना राहतील. तसेच प्रशासकिय कारणास्तव अथवा आवश्यकता भासल्यास चालविण्यात दिलेली परवानगी कराराच्या मुदतीपुर्वी रद्द करण्याचे हक्क व अधिकार पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांना राहतील.

१७. लिहुन देणार यांनी उपहारगृह स्वत: चालविले पाहिजे. त्यांना कोणत्याही सबबीवर इतर कोणालाही चालविण्यास अथवा भाडेतत्वावर देता येणार नाही. जर असे केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्याशी करण्यात आलेला करार हा त्या दिनांकापासुन रद्द झाला असे समजण्यात येईल आणि लिहुन देणार यांनी अनामत म्हणुन जमा केलेली रक्कम परत केली जाणार नाही.

१८. सदर उपहारगृहात काम करणारे कामगार/ आचारी यांना कोणाताही चर्मरोग अथवा गंभीर आजार नसावा याची दक्षता लिहुन देणार यांनी घ्यावी. उपहारगृहामध्ये काम करणा-या कर्मचा-यांचे चारित्र चांगले असणे आवश्यक आहे.

१९. अधिका-यांचे कक्षामध्ये चहा, नाष्टा, जेवण देतेवेळी काम करणारा तसेच चहा,कॉफी देण्यासाठी येणारा कामगार वर्ग योग्य व स्वच्छ पोषाक परिधान केलेला असला पाहीजे. उपहारगृह चालकाने व त्यांच्या कामगार वर्ग यांनी उपहागृहात येणा-यांशी व संबंधीतांशी अदबीने वागावयास पाहीजे.

२०. पोलीस अधिकारी यांच्यासाठी उपहारगृहात स्वतंत्र व्यवस्था असावी.

२१. आग प्रतिबंधक सुरक्षा व्यवस्था करणेची जबाब्दारी लिहुन देणार यांची राहील.

२२. उपहारगृहामध्ये सुट्टे पैसे नसल्यास चॉकलेट किंवा तत्सम बाबी देता येणार नाही.

२३. लिहुन देणार याने ठेवलेल्या कामगार वर्गास उपहारगृहामध्ये राहण्यासाठी जागा उपलब्ध करुन देवु नये.

२४. उपहारगृहामधील पदार्थ पोलीस अधिक्षक कार्यालयाचे परिसरात फिरुन इतरत्र विकता येणार नाही.

Scanned with CamScanner

२५. उपहारगृहामधील खाद्य पदार्थाबाबत शासकिय नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

२६. तंबाखु/जर्दा, गुटखा, दारु इ. नशा येणारे पदार्थ यांची विक्री करता येणार नाही.

२७. सदर कराराअन्वये उपहारगृहावर कोणत्याही प्रकारचे बोजे निर्माण करता येणार नाही. जेणेकरुन सदरचे करारनाम्याचे अटी व शर्तीचे उल्लंघन लिहुन देणार यांचेकडुन होणार नाही. तसे काही आढळुन आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी लिहुन देणार यांची राहील.

२८. या करारनाम्याची मुदत संपताच लिहुन देणार यांनी सदर मिळकतीतील त्यांचे साहित्य काढुन घेवुन मिळकतीचा वापर त्वरीत बंद करावयाचा आहे.

२९. सदर करारनाम्यातील सर्व शर्ती व अटी पालन करणे लिहुन घेणार व लिहुन देणार यांचेवर बंधनकारक राहतील.

३०. हयाशिवाय इतर कोणतीही अडचण उद्‌भवल्यास त्याबाबत अंतिम निर्णय घेणेबाबतचा अधिकार पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांना राहील.

३१. सदर निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे तसेच फेरबदल करण्याचे अधिकार पोलीस अधीक्षक अहमदनगर यांनी राखून ठेवलेले आहेत. सदर जाहिरात **https://ahmednagardistpolice.gov.in/** वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**(मनोज पाटील)**
पोलीस अधीक्षक, अहमदनगर

Scanned with CamScanner